# ग्रामीण कृषि मौसम सेवा

## डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि भारत मौसम विभाग

ईमेल – gkmsakola@yahoo.com

## अमरावती जिल्हा कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक - ०२ / २०२४ - २०२५

**दिनांक: शुक्रवार १२ एप्रिल २०२४**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १३ एप्रिल ते १७ एप्रिल २०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १३/०४ | १४/०४ | १५/०४ | १६/०४ | १७/०४ |
| पाऊस (मिमी) | 19.3 | 16.6 | 2.4 | 3.2 | 0 |
| कमाल तापमान (अ.से.) | 34.8 | 35 | 36.5 | 39 | 39.8 |
| किमान तापमान (अ.से.) | 22.5 | 23 | 23.8 | 24.3 | 26.1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 74 | 70 | 66 | 62 | 60 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 49 | 45 | 41 | 37 | 32 |
| वा-याचा वेग (किमी / तास) | 12 | 5 | 4 | 3 | 5 |
| वा-याची दिशा | 136 | 106 | 197 | 109 | 118 |
| आकाश स्थिती | अंशतःढगाळ | अंशतःढगाळ | अंशतःढगाळ | अंशतःढगाळ | अंशतःढगाळ |

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| हवामान अंदाज | | • प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, नागपूर यांच्या कडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार दिनांक १२ एप्रिल रोजी विरळ ठिकाणी हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची अत्याधिक संभावना आहे, दिनांक १३-१६ एप्रिल तुरळक ठिकाणी हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची अत्याधिक संभावना आहे. पुढील ५ दिवस कमाल तापमानात फारसा बदल नाही.<br>• सतर्क ईशारा: दिनांक १२ एप्रिल दरम्यान एक - दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना व वारा (५०-४० कि.मी प्रती तास) राहण्याची शक्यता आहे. दिनांक १३ एप्रिल दरम्यान एक - दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना व वारा (३०-४० कि.मी प्रती तास) राहण्याची शक्यता आहे व दिनांक १४ एप्रिल दरम्यान एक - दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता आहे. |
| सर्व पिके | | • सद्यस्थितीत कमाल व किमान तापमानात वाढ झालेली आहे त्यामुळे बाष्पीभवननाचा वाढता वेग पाहून आवशक्यता नुसार ६ - ७ दिवसांनी उन्हाळी पिके, भाजीपाला व फळपिकांना ओलिताची वेवस्था करावी. |
| उन्हाळी कामे | | • रबी पिके निघालेल्या शेताची त्वरित खोल नांगरणी करावी, त्यामुळे जमीन तापण्यास मदत होवून किडींचे कोष व घातक बुरशीचा नायनाट होईल. |
| उन्हाळी मुग | फुलोर | • पिकाला पहिल्या ६ ते ७ आठवडे तणविरहित ठेवावे, त्यासाठी आवश्यकतेनुसार २-३ वेळा कोळपणी व निंदणी करावी. |
| उन्हाळी भुईमुग | फुलोर / शेंगा धारण | • उन्हाळी भुईमूग पिकास आऱ्या सुटण्यापूर्वी डवऱ्याच्या जानकूळास दोरी बांधून मातीची भर द्यावी उन्हाळी भुईमूग पिकास आवशक्यता नुसार ८ - १० दिवसांनी ओलिताची वेवस्था करावी. पाने पोखरणाऱ्या अळी, तुडतुडे व फुलकिडेच्या नियंत्रणासाठी लाम्बडाक्यहालोत्रीन ५ टक्के प्रवाही ४.० ते ६.० मि. ली किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २८ मि.ली प्रती १० लिटर पाण्यात प्रमाणे फवारणी करावी.<br>• पिकाला पहिल्या ६ ते ७ आठवडे तणविरहित ठेवावे, त्यासाठी आवश्यकतेनुसार २-३ वेळा कोळपणी व निंदणी करावी.<br>• सद्यस्थितीत कोरडे हवामान पाहता मातीच्या ओलाव्याचे निरक्षण करून १०-१२ दिवसाच्या अंतराने पाण्याचे नियोजन करावे व हे करतांना शेतात पाणी साचणार नाही व पिकाला मूळकुज होणार नाही याची काळजी घ्यावी. |
| उन्हाळी तिळ | वाढ | • उन्हाळी तिळामध्ये सद्यस्थितीत कोरडे हवामान पाहता मातीच्या ओलाव्याचे निरक्षण करून तुषार सिंचनाने पाण्याचे नियोजन करावे व हे करतांना शेतात पाणी साचणार नाही व पिकाला मूळकुज होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच पिकाला पेरणीनंतर ३० दिवसांनी नत्र खताचा उरलेला हप्ता प्रती १२.५ किलो हेक्टरी ध्यावा. |
| उन्हाळी सुर्यफुल | फुलोर | • उन्हाळी सुर्यफुल पिकास डवऱ्याच्या जानकूळास दोरी बांधून मातीची भर द्यावी, सध्याचे हवामान पिकावर फुल किड्यांचा प्रादुर्भाव होण्यास पोषक आहे त्याच्या नियंत्रणासाठी ईमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रती २.० मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी उन्हाळी तीळ पिकास आवशक्यता नुसार ८ - १० दिवसांनी ओलिताची वेवस्था करावी. उन्हाळी सुर्यफुल पहिले ४५ दिवस तणविरहित ठेवावे, त्यासाठी आवश्यकतेनुसार २-३ वेळा कोळपणी व निंदणी करावी. |
| चारा पिक | वाढ | • जनावरांना चा-यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार एकदल वर्गीय (मका, ओट) व व्दिदल वर्गीय (लसुन, बरसीम) घासाची पेरणी करावी. |
| फळ पिक | वाढ | • सद्यस्थितीत कोरडे हवामान पाहता मातीच्या ओलाव्याचे निरक्षण करून सर्व फळबागेला / संत्रा बागेला मध्ये ओलिताचे नियोजन करावे.<br>• सद्यस्थितीत कोरडे हवामान व मार्च महिन्याच्या उष्णतामानातही वाढ पाहता संत्रा व मौसंबी बागेला जमिनीनुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने नियमित पाणी द्यावे. ठिबक सिंचन संच असल्यास १ ते ४, ५ ते ७ व ८ वर्षावरील झाडांना अनुक्रमे १२ ते ५३, ७८ ते १२७ व १४५ ते १८० लिटर प्रती दिवस पाणी ध्यावे.<br>• आंबा बागेमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम ४६.२७ टक्के एससी प्रती १० ग्रॅम ची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• सध्यस्थितीत फळझाडास बांबू किंवा इतर स्तानिक सामुग्रीचा उपयोग घेऊन आधार ध्यावा. |
| भाजीपाला | लागवड | • कांदा पिकास आवशक्यता नुसार ८ - १० दिवसांनी ओलिताची वेवस्था करावी. कांदा पिकावर फुल किडे चा प्रादुर्भाव लक्षात घेऊन क्विनॉलफॉस २५ टक्के १२ मि.ली १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी करावी. कांद्यावर करप्याचा प्रादुर्भाव आढळल्यास मेन्कॉझेब ७५ टक्के डब्लू ई २५ ग्रॅम + सन्डोव्हीट स्टिकर १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी करावी.<br>• ४-६ आठवड्याची रोपे झाली असल्यास उन्हाळी मिरची, वांगी व टामोटोची पुनर्लागवड लगेच करून घावी.<br>• शिफारसीनुसार या महिन्यात गावर, काकडी, दुधी भोपळा, काशीफळ, दोडका, कारली, ढेमसे, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीरची लागवड करावी व त्यांचे ठिबक किंवा सिंचन पद्धतीने ओलीत वेव्स्थापन करावे. |
| पशु / जनावरे | -- | • दिनांक १२ एप्रिल दरम्यान एक - दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना व वारा (५०-४० कि.मी प्रती तास) राहण्याची शक्यता आहे. दिनांक १३ एप्रिल दरम्यान एक - दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना व वारा (३०-४० कि.मी प्रती तास) राहण्याची शक्यता आहे व दिनांक १४ एप्रिल दरम्यान एक - दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता असल्यामुळे जनावांची योग ती काळजी घ्यावी व सुरक्षित ठिकाणी त्यांना आश्रय ध्यावा.<br>• शेतकऱ्यांनी बाष्पीभवननाचा वाढता वेग पाहून आवशक्यता नुसार जनावरांना स्वच्छ पाणी व हिरवा चारा द्यावा. कोंबड्यांना वाढत्या तपमानापासून सांभाळण्या साठी कोंबड्यांची शेड पूर्व - पश्चिम असावी. यामुळे घरात हवा खेळती राहते. कोंबड्यांना प्रत्यक्ष उन्हापासून संरक्षण मिळते. पोल्ट्री शेडच्या वर व भिंती पांढर्या ( चुन्याने) रंगाने रंगवाव्यात. छतावर पाण्याचे फवारे लावावेत व छत झाकून ठेवावे, शेडमध्ये गर्दी टाळावी. आवश्यक तेवढया कोंबड्या ठेवाव्यात.<br>• सतर्क इशारा करिता दामिनी मोबाईल अप चा उपयोग करावा. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.

नोडल अधिकारी
ग्रामीण कृषि मौसम सेवा, अकोला
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

संशोधन सहयो�ी
ग्रामीण कृषि मौसम सेवा,
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला